शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था
अमरावती
जावक क्र. 878
दिनांक 18/05/2026

# शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, (स्वायत्त) अमरावती

## निविदा सुचना

(२ माळी सेवकांचा ठेका कंत्राट पद्धतीने देण्याकरिता)

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, (स्वायत्त) अमरावती येथील २ माळी सेवकांचा ठेका कंत्राटी पध्दतीने देण्याकरीता दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रकाद्वारे ऑफलाईन पध्दतीने निविदा मागण्यात येत

| अ.क्रं | तपशिल | सेवेचा कालावधी | निविदा फॉमची किंमत (Form amount) | निविदेमध्ये सहभागी होण्याची रक्कम (Tender application cost) ना परतावा | बयाणा रक्कम ( EMD) (संचालक, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती यांचे नावे डिमांड ड्राफ्ट ) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ४ | | ५ |
| १ | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती मध्ये माळी सेवकांचा ठेका कंत्राट पद्धतीने देण्याकरिता (२ माळी) | ११ महीने किंवा शासनाने बाहय यंत्रणे मार्फत कडुन मनुष्यबळ उपलब्ध होईपर्यत | | २००० रुपये | ७५०० रुपये |

आहे.

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था,(स्वायत्त)अमरावती येथील माळी सेवकांचा ठेका कंत्राट पद्धतीने देण्याकरिता दोन लिफाफा ई निविदा पदधतीने मागविण्यात येत आहे

**टिप**:- संपूर्ण निविदा प्रक्रिया ही ई निविदा पध्दतीने होत असून निविदा सूचना अटी व शर्ती तसेच शुद्धीपत्रक इत्यादी माहिती संस्थेच्या संकेतस्थळ www.gvishamt.org उपलब्ध करुन देण्यात येईल.

दरपत्रक सादर दिनांक १८.०५.२०२६ रोजी दुपारी १२.०० ते दिनांक २९.०५.२०२६ रोजी सांय. ५.०० वाजेपर्यत नमुद केलेल्या कालावधी नंतर दरपत्र स्विकारले जाणार नाही. याबाबत सर्व पुरवठादारांनी नोंद घ्यावी.

दिनांक :- १८.०५.२०२६
स्थळ :-अमरावती

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था सत्यमेव अमरावती

**(डॉ.सतिश एन.माळोदे)**
**संचालक**
**शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान**
**संस्था, अमरावती**

## प्रपत्र अ

**अटी व शर्ती :**

१) पुरवठाधारकाने विहीत कालावधीत अर्धवट काम सोडून गेल्यास (आदेशान्वित करण्यात आलेल्या कालावधीच्या आत) त्यास अदा केलेल्या कामाचा कोणताही मोबदला दिला जाणार नाही. कंत्राटदाराचे नाव काळया यादीत टाकून अनामत रक्कम जप्त केली जाईल. त्याचप्रमाणे जे काम कंत्राटदाराकडून वेळेवर व सुयोग्य प्रकारे केले जाणार नाही, ती कामे उपलब्ध बाहेरील एजन्सीज/सेवकांकडून करुन घेऊन पुर्ण खर्च कंत्राटदाराच्या अनामत रक्कमेतून वसूल केला जाईल.

२) मंजुर झालेल्या कंत्राटधाराकास एकुण वार्षिक निधीच्या १० % अनामत रक्कम **संचालक, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती** यांचे नावे १५ दिवसाचे आत कार्यालयात धनाकर्षाद्वारे भरावी लागेल. असे न-केल्यास, खरेदीदार निकालाची अधिसुचना रद्द करुन शकेल. शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग- III/उदयोग-४ दिनांक ०१.१२.२०१६ मधील ४.६ (क व ड) मध्ये नमुद केल्याप्रमाणे अनामत रक्कमेमध्ये सुट देण्यात येईल. कंत्राट कालावधी सुव्यवस्थित परीपुर्ण झाल्यानंतरच अनामत रक्कम परत करण्यात येईल.

३) कंत्राटदाराने नेमलेले माळी सेवक कामावर असताना गणवेश परीधान करणे व ओळखपत्र दर्शनीभागावर लावणे बंधनकारक राहील. कंत्राटधारकास माळी सेवकांना गणवेश व ओळखपत्र पुरविणे बंधनकारक असेल.

४) किमान वेतन कायदा १९४९ मधील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे कंत्राटधारकास बंधनकारक राहील. माळी सेवकांना कामगार कायद्या प्रमाणे वेतन व भत्ते देण्याची सर्व जबाबदारी कंत्राटधारकावर राहील.

५) तांत्रिक अडचणी मुळे निविदा नाकारणे अथवा कोणतेही कारण न दाखवता निविदा प्रक्रीया रद्द करण्याचे सर्व अधिकार तसेच त्यामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार **संचालक, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था,अमरावती** यांनी राखून ठेवलेले आहे.

६) निविदा मंजूर झाल्यानंतर रुपये ५००/- स्टँम्प पेपरवर अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा तसेच पुरवठा आदेशामध्ये नमुद कालावधीचे समाधानकारक सेवा देण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रुपये १०० स्टँम्प पेपरवर लिहून देणे कंत्राटधारकास बंधनकारक राहील.

७) लिफाफा (तांत्रिक) क्रमांक १ मध्ये सर्व कागदपत्रे सादर करण्यात यावीत. सदर कागदपत्रे पुर्ण असतील तरच पात्र कंत्राटदाराचा लिफाफा (वित्तीय) क्रमांक २ उघडण्यात येईल. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

८) निविदे सोबत असलेली सर्व कागदपत्रे साक्षांकीत असणे आवश्यक आहे.

९) माळी सेवकांचे उत्तरदायित्व संबंधीत कंत्राटदार संस्थेची /एजन्सीची राहील.

१०) **निविदा भरतांना कंत्राटधारकास येणाऱ्या खर्चाबाबत**: निविदा सादर करतांना सर्व खर्चाची संपूर्ण जबाबदारी ही कंत्राटधारकाची असेल याबाबत कंत्राटदारास प्रतिपुर्ती हक्क सांगता येणार नाही. तसेच सदरची निविदा प्रक्रीया रद्द झाली अथवा निविदा नामंजूर झाली असल्यास सादर करण्यात आलेल्या निविदे करीता झालेल्या खर्चाची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही याची नोंद घ्यावी.

११) **निविदा प्रक्रीये बाबतचे स्पष्टीकरण:** निविदा प्रक्रीया ही पुर्णत: ऑफलाईन असल्यामुळे काही शंका अथवा तक्रारी असल्यास प्रत्यक्ष कार्यालयामध्ये येवून संबंधीत कंत्राटदाराने निविदेमध्ये दिलेल्या कालावधीत सादर कराव्यात. ऑफलाईन किंवा संस्थेच्या ई-मेलवर सादर करण्यात आलेल्या तक्रार अथवा शंका विचारात घेतल्या जाईल यांची पुरवठादारांने नोंद घ्यावी.

१२) **निविदा प्रक्रीयेतील बदलाबाबत:** संचालक, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती यांना निविदेमध्ये काही बदल करावयाचे असल्यास निविदेच्या अंतिम दिनांकापुर्वी शुद्धीपत्रकाव्दारे बदल करु शकतील. शुद्धीपत्रकाव्दारे निविदे मधील बदल हे ग्राहय धरले जातील व सदरचे बदल हे निविदेच्या अटी व शर्तीच्या अधिन राहतील. प्रसिद्ध केलेल्या शुद्धीपत्रकामुळे (गरजेनुसार) निविदा सादर करण्यास अतिरिक्त कालावधी वाढविण्याचा हक्क **संचालक, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती** यांनी

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था
सत्यमेव
अमरावती

राखून ठेवलेला आहे. या बाबतची माहिती संस्थेच्या संकेतस्थळावर www.gvishamt.org प्रसिद्ध केली जाईल व ती माहिती निविदा भरु इच्छिणाऱ्याना लागू होईल.

१३) **निविदा सादर करणे बाबत:** निविदा या विहित मुदतीत दोन लिफाफा पद्धतीने सादर करावयाची आहेत. तांत्रिक लिफाफा क्र. १ व वित्तीय लिफाफा क्र. २ तसेच अपूर्ण लिफाफा सादर केल्यास अथवा आवश्यक कागदपत्रांची पूर्तता नसल्यास निविदा ना मंजूर करण्यात येईल.

१४) **अनामत सुरक्षा रक्कम जप्त करणे बाबत:** कंत्राटदार आपली वैधता कालावधी कामकाज पुर्ण करण्यास असमर्थ ठरल्यास अथवा कार्यालयास याबाबत कंत्राटधारकांनी वैधता कालावधी पूर्ण करणे अगोदर लेखी न कळविल्यास अनामत सुरक्षा रक्कम जप्त केली जाईल यांची नोंदी घ्यावी.

१५) कंत्राटधारकाने रुपये ५०० च्या स्टॅम्प पेपरवर करार करुन देणे बंधनकारक असेल.

१६) **निविदेच्या गोपनियतेबाबत :** कंत्राटधारकाने सादर केलेली कागदपत्रे तपासणी आधी किंवा तपासणी झाल्या नंतर सदर बाबतीत स्पष्टीकरण व दरांचा तुलनात्मक तक्ता, समितीच्या शिफारशी तसेच कंत्राटधारकांस जे कंत्राट प्रक्रियेत सहभागी झालेत अथवा सहभागी झाले नाहीत, अशा कोणत्याही व्यक्तीस अथवा संस्थेस देता येणार नाही.

१७) **भ्रष्ट,फसवणूक अथवा अव्यवहार्य सेवेबाबत:** भ्रष्ट, फसवणूक अथवा अव्यवहार्य सेवा असणाऱ्या तसेच उपरोक्त आरोप असलेले व याबाबतची माहिती कार्यालयापासून लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास मंजूर कंत्राट कोणत्याही स्तरावर रद्द करण्यात येईल.

१८) **कंत्राटधारकाकडुन पुरविण्यात येणाऱ्या सोयी** :-

a. झाडु, झाडाची छाटणी करण्याकरीता लागणारी कैची
b. कुऱ्हाड,विळा,पावडे,झाडाना पाणी देण्याकरीता पाईप इत्यादी उद्यानाकरीता लागणारी अनुषंगिक साहीत्य
c. माळीना गणवेश व ओळखपत्र
d. क्वचित प्रसंगी संस्थेत पाणी पुरवठा झाला नाही तर निविदाधारकाने विहीरीचे अथवा टँकर मागवून स्वच्छता करुन घेणे आवश्यक राहील.
e. बगीचा व परिसरातील झाडे, गवत कापणे, मोठया व लहान झाडांची छटाई करणे

१९) **न्यायालयीन प्रकरणे:** सदर प्रकरणी कुठलेही न्यायालयीन प्रकरणे किंवा कायदेशीर तक्रार असल्यास त्याकरीता अमरावती महानगर पालिका क्षेत्रात दाखल करावी. तसेच संस्थेच्या निदर्शनास आनून दयावे.

२०) **कंत्राटधारकास दयावयाचा मोबदला व वेतन अदा करणेबाबत :**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग/ उच्च शिक्षण संचालनालय यांचे कडुन BDS वर अनुदान उपलब्ध झाल्याशिवाय देयके अदा करण्यात येणार नाही, तसेच कोणत्याही प्रकारचा अग्रिम मान्य करण्यात येणार नाही. शासकीय अनुदान उपलब्धते नुसार देयकाची रक्कम अदा करण्यात येईल. शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे सर्व कपाती करुनच कोषागार कार्यालयामध्ये देयके सादर करण्यात येतील व कोषागारामधुन पारीत झालेल्या देयकांची रक्कम कंत्राटधारकांच्या खात्यामध्ये CMP प्रणालीद्वारे वर्ग करण्यात येईल. शासकीय अनुदान वेळेवर उपलब्ध न झाल्यास कंत्राटधारकास विलंबाने देयकची रक्कम अदा करण्यात येईल. अशा परीस्थितीत कंत्राटधारकास उशीरा देयाकाची रक्कम मिळाल्याबद्दल देय रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही. **कंत्राटधारकाने नेमलेल्या कंत्राटी माळी सेवकांचे वेतन दर महीन्याच्या ७ तारखेच्या आत किमान वेतन कायदयानुसार देण्याचे त्यांचेवर बंधन राहील.** माळी सेवकांची दैनदिन हजेरी पुस्तक कार्यालय प्रमुखांनी मांगितल्यास तात्काळ सादर करावे.

२१) कंत्राटदाराने नेमलेल्या माळी सेवकांचे रजिस्टर वर उपस्थिती नोंद घेवुन देयकासोबत मासिक उपस्थीती नोंदीची प्रत देयकासोबत सादर करावी.

२२) नियमानुसार सेवाकर व शासनाचे इतर सर्व कर भरण्याची जबाबदारी ही कंत्राटदाराच्या संस्थेची राहील याबाबतची कोणतीही जबाबदारी ही या संस्थेची राहणार नाही. याबाबत भविष्यात काही अडचण निर्माण झाल्यास, त्यास पुरवठादार संस्था जबाबदार राहील. तसेच भविष्यात कोणत्याही जादाचे सेवा शुल्काची मागणी करता येणार नाही.

२३) सर्व राष्टीय सण किंवा सुट्टीच्या दिवशी संस्थेमध्ये काही शैक्षणिक कार्यक्रम राहील्यास संस्थेतील कामांकरीता उपस्थित राहणे बंधनकारक राहील.



शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था सत्यमेव अमरावती

२४) कंत्राटदाराने नेमलेल्या माळी सेवकांचे निष्काळजीपणामुळे संस्थेच्या मालमत्तेचे नुकसान अथवा चोरी झाल्यास भरपायीची रक्कम कंत्राटधाराकाकडून वसूल करण्यात येईल.

२५) पुरवठादार संस्थेकडुन निविदा प्राप्त झाल्यानतंर माळी कर्मचाऱ्यांचे पुढील प्रमाणे कागदपत्रे संस्थेमध्ये सादर करावी. माळी कर्मचाऱ्यांचे आधार कार्ड, पासपोर्ट आकाराचा फोटोग्राफ, पोलीस स्टेशन मधील चारित्र्याचे प्रमाणपत्र (मागील ६ महीन्यांच्या आतिल असावे), माळी सेवकांमध्ये बालकामगाराचा समावेश करण्यात येऊ नये, तसे प्रतिज्ञापत्र नोटरी करुन संस्थेमध्ये जमा करावे.बदली कामगार कामावर येत असेल तर त्यांची संपुर्ण माहिती व वरील सर्व कागदपत्रे कार्यालयामध्ये सादर करावी.

२६) सदर कंत्राटाची वैधता ११ महीने किंवा शासनाने बाहय यंत्रणे मार्फत मनुष्यबळ उपलब्ध होईपर्यत यापैकी जे आधी होईल तोपर्यंत माळी सेवकांची सेवा पुरविण्याबाबत आदेशित करण्यात येईल.

२७)**कंत्राटदाराने नेमलेल्या स्वच्छकांच्या सेवेचे संनियंत्रन:-** माळी सेवकांच्या कामाची पाहणी अचानकपणे संचालक/प्रबंधक अथवा कार्यालयीन कर्मचारी यांचे मार्फत केव्हाही केली जाईल. त्याबाबतचे अभिप्राय नोंदविले जातील व असमाधानकारक सेवेबाबत समज देण्यात येईल. कामात सुधारणा दिसून न आल्यास प्रतिदिन रु.५०/- इतका दंड आकारण्यात येईल. सदरील महीन्याच्या देयकामधुन दंडाची रक्कम वजा करुनच वेतन अदा केले जाईल. कंत्राटधारकाची सेवा मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने दिसून आली नाहीत, तर कोणत्याही क्षणी **संचालक, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती** हे कंत्राट रद्द करतील व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२८) **बयाना रक्कम :-** सुक्ष्म व लघु, मध्यम उद्योग विकास अधिनियम-२००६ अंतर्गत उत्पादक म्हणुन नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना निविदा शुल्क व बयाना रक्कम भण्यापासुन सुट देण्यात आली आहे

२९) शासकीय मंडळ /महामंडळ/उपक्रमांना तसेच सुक्ष्म व मध्यम उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना निविदेमध्ये निविदा शुल्क व बयाना रक्कम भण्यापासुन सुट देण्यात यावी. यामध्ये महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ/महासंघ हे वगळता इतर नोंदणीकृत पुरवठादारांना उत्पादकाकडुन अधिकृत विक्रेता असल्याचे प्राधिकार पत्र सादर करणे आवश्यक राहील

३०) माळी सेवकांचा विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालयातुन विमा करणे कंत्राटधारकास बंधनकारक राहील.

३१) **सदरील निविदा ही महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार संस्थेकरीता राखीव करण्यात आलेली असुन इतर राज्यातील पुरवठादारांना निविदेमध्ये सहभागी करुन घेतले जाणार नाही याची पुरवठादार संस्थेने नोंद घ्यावी.**

३२) संस्थेच्या बगीच्या मधील जमा होणारा ओला व सुका कचरा संस्थेबाहेर घेवून जाण्याचे काम पुरवठादार संस्थेचे राहील.

३३) **संस्थेतील इमारत , परिसर व रस्ते दर्शविणारा तक्ता :-**

| अ.क्र. | परीसर |
|---|---|
| १ | अप्सरा उद्यानातील झाडांची , लॉनची, व इतर बाबीची निगा राखणे, वेळोवेळी झाडांची छटाई करणे, फवारणी करणे, झाडांना खत टाकणे व संपुर्ण देखभाल करणे इत्यादी. |
| २ | महात्मा फुले, आंबेडकर उद्यानांची निगा राखणे, वेळोवेळी झाडांची छटाई करणे, फवारणी करणे, झाडांना खत टाकणे व संपुर्ण देखभाल करणे. |
| ३ | वनस्पतीशास्त्र उद्यान देखभाल व निगा राखणे, वेळोवेळी झाडांची छटाई करणे, फवारणी करणे, झाडांना खत टाकणे |
| **वरील उद्यानांची कामे करुन खालील कामे करणे माळी सेवकांना बंधनकारक राहील** | |
| ४ | मुख्य प्रवेश द्वारापासुन ते सहसंचालक ,उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती कार्यालया पर्यंतचा रस्त्यांचे दोन्ही बाजुचे गवत कापणे |
| ५ | उपहारगृह ते शारिरीक शिक्षण विभाग गेट पर्यंतचा रस्ता बाजुचे गवत कापणे |
| ६ | मुख्य प्रवेश द्वारापासुन(डावी बाजु) ते वनस्पतीशास्त्र इमारत पर्यंतचा रस्ताच्या बाजुचे गवत कापणे |
| ७ | मुलींचे जुने व नविन वसतीगृह व त्या भोवतालचा परिसर व रस्ते बाजुचे गवत कापणे |
| ८ | मुलांचे पुर्व व पश्चिम वसतीगृह व त्या भोवतालचा परिसर व रस्ते बाजुचे गवत कापणे |

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती

| | |
|---|---|
| ९ | जीवशास्त्र इमारत व शारिरीक शिक्षण विभाग व त्या भोवतालचा परिसर व रस्ते बाजुचे गवत कापणे |
| १० | भाषा भवन समोरील संपुर्ण परिसर व रस्ते बाजुचे गवत कापणे |
| ११ | ग्रंथालय व योगभवन च्या सर्व बाजुंचा परिसर व रस्त्यांच्या बाजुचे गवत कापणे |
| १२ | भूगोल इमारत व भोवतालचा परिसर व रस्ते बाजुचे गवत कापणे |
| १३ | मुख्य इमारत व त्यामधील रसायनशास्त्र, पदार्थ विज्ञान, गणित विभाग व त्याभोवतालचा परिसर व रस्ते बाजुचे गवत कापणे |
| १४ | संगीत, गृहशास्त्र इमारत परिसर व रस्ते बाजुचे गवत कापणे |
| १५ | बगीच्यामधील व परिसरातील झाडांची आवश्यकतेनुसार लहान व मोठया झांडाची छटाई करणे. |
| १६ | गवतावर तणनाशक तसेच जंतुनाशक फवारणी करणे |
| १७ | संस्थेतील भोसले सभागृहाच्या सभोवतालचे गवत कापणे व झाडाची निगा राखणे. |

(डॉ.सतिश एन.माळोदे)
संचालक,
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था,
अमरावती

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था
सत्यमेव
अमरावती

## तांत्रिक लिफाफा क्र.-१

**तांत्रिक लिफाफ्यासाठी आवश्यक कागदपत्रे**

१) संस्था नोंदणी प्रमाणपत्र / व्यवसाय प्रमाणपत्र **(संस्था नोंदणी प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य)**

२) मागील तीन वर्षाचे ITR form संस्थेच्या किंवा अध्यक्षांच्या नावाने भरलेले प्रमाणपत्र जोडावे. (Assessment year २०२५-२६,२०२४-२५, २०२३-२४,) (नमुद कालावधीतील ITR जोडावे)

३) Turn Over Certificate २०२५-२६,२०२४-२५, २०२३-२४, संस्थेच्या किंवा अध्यक्षांच्या नावाने

४) मागील वर्षात संस्थेने माळी सेवा म्हणुन शासकीय व निमशासकीय संस्थेत सेवा पुरविले बाबत पुर्वानुभवाची प्रमाणपत्र मागील ३ वर्षाचे (२०२५-२६,२०२४-२५, २०२३-२४) व कामाच्या आदेशाची प्रत जोडावी. **(दोन्ही बाबी अनिवार्य आहे)** (मागणी करण्यात आलेल्या कालावधीतील अनुभव प्रमाणपत्र व आदेशाच्या प्रती जोडाव्यात)

५) संस्थेचे नावाने GST रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडावे.

६) कंत्राटदाराची पॅन कार्डची सत्यप्रत. संस्थेच्या किंवा अध्यक्षांच्या नावाने

७) महाराष्ट्र कामगार कल्याण बोर्ड यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र. **(अनिवार्य)**

८) कंत्राटधारक शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळया यादीत नसल्याचे, रु.१०० चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र नोटरी करुन जोडावे. प्रतिज्ञापत्र निविदा कालावधीतील असावे **(प्रारुप सोबत जोडण्यात आले आहे.)**

९) निविदेतील प्रपत्र अ मधील अटी व शर्ती मान्य व स्विकृत असल्याचे पाकीट क्र १ (तांत्रिक लिफाफा) मध्ये कंत्राटधारकाच्या सही व शिक्कयासह सादर करावे. **(सदरील प्रपत्र संस्थेने निविदा नोटीस प्रसिध्द केलेल्या प्रपत्रावर पुरवठादार संस्थेचा सही व शिक्का नमुद करुन सादर करावा. पुरवठादार संस्थेच्या लेटर हेडवर स्विकारला जाणार नाही यांची पुरवठादार संस्थेने नोंद घ्यावी)**

१०) बयाना रक्कम सुट असल्यास त्याचे प्रमाणपत्र **(Udyam/MSME/NSE)**

११) **निविदेमध्ये सहभागी होण्याची रक्कम संस्थेच्या कार्यालयामध्ये भरुन सदरील पावती तांत्रिक लिफाफा मध्ये सादर करावी. सदरील शुल्क ना परतावा आहे.**

१२) कंत्राटधारकांने अन्य कोणास अधिकार दिले असल्यास त्या संबंधीत मुखत्यार पत्र किंवा मंडळाचा ठराव किंवा अधिकार पत्र जोडण्यात यावे.**(पुरवठादार संस्थेने इतरांना अधिकार दिले असल्यास तरच मुखत्यार पत्र जोडावे अन्यथा सदरील कागदपत्र अनिवार्य करण्यात आलेले नाही. )**

१३) संस्थेच्या उद्यानाची पाहणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र (अनिवार्य)

**वरील तांत्रिक लिफाफ्यासाठी आवश्यक १ ते १३ कागदपत्रांच्या व्यतीरिक्त अनावश्यक कागदपत्रे जोडल्याचे समितीच्या निदर्शनास आल्यास पुरवठादार संस्थेस तांत्रिक कागदपत्रामध्ये अपात्र ठरविण्यात येईल.**

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था
सत्यमेव
अमरावती

# वित्तीय लिफाफा

सन २०२६-२७ मध्ये ११ महीन्याकरीता किंवा शासनाने माळी सेवकांची नियुक्ती होईपर्यत जे आगोदर घडेल त्या कालावधी करीता आवश्यक असणाऱ्या २ माळी सेवकांची सेवा पुरविणे करीता सर्व कर/खर्च यांचा समावेश करुन सादर केलेल्या दरांचा तक्ता.

निविदाधारकाचे नाव -----------------------------------------------------------------------------------------------

| अ.क्र. | तपशिल | सेवाचा कालावधी | मासिक कालावधीसाठी एकुण रक्कम रुपये ठेका (सर्व करांसहीत) | |
|---|---|---|---|---|
| | | | अंकी | अक्षरी |
| १ | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती मध्ये माळी सेवकांचा ठेका कंत्राट | ११ महीने | | |

सुचना :- संस्थेचा परिसर पाहुनच कंत्राट सादर करण्यात यावे. तद्नंतर कोणतीही तक्रार करता येणार नाही.

टिप :-

१. सदर दरात सर्व (GST सह) खर्चाचा समावेश करुन दर सादर करावे.
२. माळी सेवकांना आवश्यक असणारे साहीत्य हे कंत्राटदाराला पुरवावे लागतील.
३. या संस्थेकरीता माळी सेवकांचा ठेका सन २०२६-२७ मध्ये ११ महीन्याकरीता किंवा शासनाने माळी सेवकांची नियुक्ती होईपर्यत जे आगोदर घडेल त्या कालावधीकरीता करण्यात येत असल्यामुळे ठेक्याची रक्कम ही दिलेल्या अटी व शर्ती मान्य करुन व पुर्ण परिस्थितीचा विचार करुन नमुद करण्यात यावी.

Director
Govt. Vidarbha Institute of Science & Humanities (Autonomous) Amravati

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था सत्यमेव अमरावती

ठिकाण :-

दिनांक :-

कंत्राटदाराची
सही व शिक्का

**रुपये १०० मुद्रांक शुल्क पेपरवर**

वि. कार्यकारी दंडाधिकारी साहेब,अमरावती यांचे समक्ष

**काळया यादीत नसल्याचे प्रतिज्ञापत्र**

प्रतिज्ञार्थी :- पुरवठादार संस्थेचे नाव व पत्ता

मी (पुरवठादार संस्थेच्या अध्यक्षाचे संपुर्ण नाव) सत्य प्रतिज्ञेवर लिहुन देतो की, वरील प्रमाणे नमुद करण्यात आलेल्या संस्थेचा अध्यक्ष असुन सदरील संस्थेचे कार्यालय (पत्रव्यवहाराचा पत्ता) या ठिकाणी स्थापित करण्यात आलेले आहेत. (पुरवठादार संस्थेचे नाव) ही संस्था शासकीय, निमशासकीय, महामंडळ, खाजगी संस्था इत्यादी विभाग किंवा संस्थाकडुन दिनांक १८.०५.२०२६ रोजीच्या कालावधीपर्यंत काळया यादीत समाविष्ठ करण्यात आलेली नसुन संस्थेवर तसेच संस्थेच्या अध्यक्षांवर कोणत्याही प्रकारची दंडात्मक कारवाई करण्यात आलेली नाही.

दिनांक :-

स्थळ :-

सही व शिक्का

पुरवठादार संस्थेच्या अध्यक्षाचे संपुर्ण नाव

**सत्यापन**

मी (पुरवठादार संस्थेच्या अध्यक्षाचे संपुर्ण नाव) वर नमुद केलेली संपूर्ण माहीती खरी असुन सदरील माहीती खोटी व चुकीची निघाल्यास मी २०२३ च्या न्यायसंहीतेचे कलम २३६, २३७ व २२९(२) अन्वये माझी संस्था व अध्यक्ष या नात्याने शिक्षेस पात्र राहील. याची मला जाणीव आहे.

दिनांक :-

स्थळ :-

सही व शिक्का

पुरवठादार संस्थेच्या अध्यक्षाचे संपुर्ण नाव